भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# वार्ताहर परिषद अधिनियम, १९७८

**(१९७८ चा अधिनियम क्रमांक ३७)**

[२ मे १९९७ रोजी यथाविद्यमान]

# The Press Council Act, 1978

**(Act No. 37 of 1978)**

[*As in force on the 2nd May 1997*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९९

**[ किंमत : रु. १२ ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २ मे १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रेस कौन्सिल अ‍ॅक्ट, १९७८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८ अंक १ दिनांक २२ ऑक्टोबर १९९७ यात पृष्ठ ३६ ते ४२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २ खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :<br>दिनांक २२ ऑक्टोबर १९९७.

**डॉ. रघबीर सिंग,**<br>सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Press Council Act, 1978, as on the 2nd May 1997, contains the authoritative text of that Act in Marathi which was published in Gazette of India, Extra-ordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 8, dated 22nd October 1997, on pages 36 to 42.

This authoritative text wa published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :<br>Dated 22nd October 1997.

DR. RAGHBIR SINGH,<br>Secretary to the Government of India.

# वार्ताहर परिषद अधिनियम, १९७८

## कलमांचा क्रम

कलमे


### प्रकरण एक

#### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार.
२. व्याख्या.
३. जम्मू व काश्मीर किंवा सिक्किम राज्याला लागू नसलेल्या अधिनियमितीबाबत रचनेचा नियम.

### प्रकरण दोन

#### वार्ताहर परिषदेची स्थापना

४. परिषदेचे कायद्याद्वारे संस्थापन.
५. परिषदेची रचना.
६. सदस्यांचा पदावधी व सेवानिवृत्ती.
७. सदस्यांच्या सेवाशर्ती.
८. परिषदेच्या समित्या.
९. परिषद व समित्यांच्या बैठकी.
१०. सदस्यांची रिक्त पदे किंवा घटनेतील उणिवा यांच्यामुळे परिषदेची कृती किंवा कार्यवाही विधि अग्राह्य न ठरणे.
११. परिषदेचा कर्मचारी वर्ग.
१२. परिषदेच्या आदेशांचे व अन्य संलेखांचे अधिप्रमाणन.

### प्रकरण तीन

#### परिषदेच्या शक्ती व कार्ये

१३. परिषदेची उद्दिष्टे व कार्ये.
१४. टीका करण्याची शक्ती.
१५. परिषदेच्या सर्वसाधारण शक्ती.
१६. फी ची आकारणी.
१७. परिषदेला रक्कम प्रदान करणे.
१८. परिषदेचा निधी.
१९. अर्थसंकल्प.
२०. वार्षिक अहवाल.
२१. अंतरिम अहवाल.
२२. लेखा व लेखापरीक्षा.

### प्रकरण चार

#### संकीर्ण

२३. सद्भावनेने केलेल्या कार्याचे संरक्षण करणे.
२४. सदस्य, इत्यादी हे लोकसेवक असणे.
२५. नियम करण्याची शक्ती.
२६. विनियम तैयार करण्याची शक्ती.

# वार्ताहर परिषद अधिनियम, १९७८

(१९७८ चा अधिनियम क्रमांक ३७)

(२ मे, १९९७ रोजी यथाविद्यमान)

[७ सप्टेंबर, १९७८]

वृत्तपत्र स्वातंत्र्याचे जतन करणे व भारतातील वृत्तपत्र व वृत्तसंस्थांचा दर्जा राखणे व सुधारणे या प्रयोजनांकरिता वार्ताहर परिषद स्थापन करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या एकोणतिसाव्या वर्षी संसदेद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास "वार्ताहर परिषद अधिनियम, १९७८" असे म्हणता येईल. संक्षिप्त नांव व विस्तार.

(२) याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

२. संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर या अधिनियमामध्ये,— व्याख्या.

(क) "अध्यक्ष" म्हणजे परिषदेचा अध्यक्ष ;

(ख) "परिषद" म्हणजे कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेली भारतीय वार्ताहर परिषद;

(ग) "सदस्य" म्हणजे परिषदेचा सदस्य आणि त्यामध्ये अध्यक्षाचा समावेश होतो;

(घ) "विहित" म्हणजे या अधिनियमाअन्वये करण्यात आलेल्या नियमाद्वारे विहित;

(ङ) "संपादक" व "वृत्तपत्र" या संज्ञांना मुद्रण व नोंदणी पुस्तक अधिनियम, १८६७ (१८६७ चा ३) यामध्ये अनुक्रमे नेमून दिलेला अर्थ असेल आणि "श्रमिक पत्रकार" या संज्ञेला, श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५) या मध्ये नेमून दिलेला अर्थ असेल.

३. जम्मू व काश्मीर किंवा सिक्किम राज्यामध्ये अंमलात नसलेल्या कायद्याबाबतचा या अधिनियमातील कोणताही संदर्भ, हा, त्या राज्यांमध्ये कोणताही तत्सम कायदा अंमलात असल्यास त्या कायद्याचा संदर्भ असल्याप्रमाणे अर्थ लावण्यात येईल. जम्मू व काश्मीर किंवा सिक्किम राज्यांना लागू नसलेल्या अधिनियमितीबाबत रचनेचा नियम.

प्रकरण दोन

वार्ताहर परिषदेची स्थापना

४. (१) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा *तारखेपासून भारतीय वार्ताहर परिषद नावाची एक परिषद स्थापन करण्यात येईल. परिषदेचे कायद्याद्वारे संस्थापन.

(२) उक्त परिषद ही अखंड परंपरा असलेला आणि एक सामाईक मोहोर असलेला निगम निकाय असेल आणि त्याला किंवा त्याच्यावर उक्त नावाने दावा दाखल करता येईल.

५. (१) परिषदेमध्ये एक अध्यक्ष व अठ्ठावीस अन्य सदस्य यांचा समावेश असेल. परिषदेची रचना.

(२) राज्यसभेचा अध्यक्ष, लोकसभेचा सभापती आणि पोटकलम (६) अन्वये परिषदेच्या सदस्यांनी निवडलेली एक व्यक्ती यांचा समावेश असलेल्या समितीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती अध्यक्ष असेल आणि केंद्र शासन शासकीय राजपत्रामध्ये अधिसूचित करील अशा तारखेपासून हे नामनिर्देशन अंमलात येईल.

(३) इतर सदस्यांपैकी—

(क) विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार श्रमिक पत्रकारांमधून तेरा व्यक्ती नामनिर्देशित करण्यात येतील, त्यापैकी सहा वृत्तपत्रांचे संपादक व उरलेल्या त्या सात व्यक्ती संपादकांव्यतिरिक्त अन्य श्रमिक पत्रकार असतील; तथापि, संपादकांची आणि भारतीय भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांशी संबंधित संपादकाव्यतिरिक्तच्या श्रमिक पत्रकारांची संख्या अनुक्रमे तीन आणि चार पेक्षा कमी असणार नाही ;

---

*स्थायी आदेश ११५ (ई) दिनांक २८ फेब्रुवारी, १९७९, याचा भाग पाच, उपविभाग ३(क) (पृष्ठ २०३) अन्वये १० मार्च, १९६९ पासून अंमलात आला.

(ख) ज्या व्यक्तींचा स्वत:चा वृत्तपत्र व्यवस्थापनाचा धंदा आहे किंवा ज्या तो धंदा चालवतात अशा व्यक्तींमधून विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार सहा व्यक्ती नामनिर्देशित करण्यात येतील, तथापि, मोठी वृत्तपत्रे, मध्यम वृत्तपत्रे व लहान वृत्तपत्रे यांच्या प्रत्येक प्रवर्गा-मधून दोन दोन प्रतिनिधी असतील;

(ग) एक व्यक्ती वृत्तसंस्थेची व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्तींमधून विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार नामनिर्देशित करण्यात येईल ;

(घ) शिक्षण व विज्ञान, कायदा, वाङमय व संस्कृती यांचे विशेषज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या तीन व्यक्ती, त्यापकी प्रत्येकी एक व्यक्ती अनुक्रमे विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय वकील परिषद व साहित्य अकादमी यांच्याकडून नामनिर्देशित करण्यात येईल;

(ङ) पाच व्यक्ती संसदेच्या सदस्य असतील व त्यांच्यापैकी तीन सदस्य, सभापती लोकसभेच्या सदस्यांमधून नामनिर्देशित करील आणि राज्यसभेचा अध्यक्ष, राज्यसभेच्या सदस्यांमधून दोन सदस्य नामनिर्देशित करील :

परंतु, ज्या श्रमिक पत्रकाराच्या स्वत:च्या मालकीचे कोणतेही वृत्तपत्र आहे किंवा तो कोणत्याही वृत्तपत्राच्या व्यवस्थापनाचे कामकाज चालवितो, असा कोणताही श्रमिक पत्रकार, खंड (क) अनुसार नामनिर्देशनासाठी पात्र असणार नाही :

परंतु आणखी असे की, खंड (क) व खंड (ख) अन्वये नामनिर्देशन अशा प्रकारे करण्यात येईल की, नामनिर्देशित व्यक्तींमध्ये, कोणत्याही वृत्तपत्राशी किंवा एकाच नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापना-खालील वृत्तपत्रांच्या गटाशी संबंधित अशा एकापेक्षा अधिक व्यक्ती नसतील.

[1][ स्पष्टीकरण.—खंड (ख) च्या प्रयोजनार्थ, केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी अधिसूचित करील त्याप्रमाणे प्रत्येक अंकाच्या खपाच्या आधारे मोठे, मध्यम किंवा लहान "वृत्तपत्र" म्हणून त्याचे प्रवर्ग करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. ]

(४) पोटकलम ३ च्या खंड (क), (ख) किंवा (ग) अन्वये नामनिर्देशन करण्यापूर्वी, प्रथम परिषदेच्या बाबतीत केंद्र शासन व नंतरच्या कोणत्याही परिषदेच्या बाबतीत पूर्वीच्या परिषदेचा निवृत्त होणारा अध्यक्ष, खंड (क), (ख) किंवा (ग) मध्ये निर्देशिलेल्या प्रवर्गाच्या व्यक्तींच्या अधिसंघातून, प्रथम परिषदेच्या बाबतीत केंद्र शासन व नंतरच्या परिषदेच्या बाबतीत स्वत: परिषद या बाबतीत अधिसूचित करील त्या प्रमाणे, नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांच्या दुप्पट संख्येइतक्या नावांचा समावेश असलेले पॅनेल विहित रीतीने मागवील :

परंतु, जेथे, उक्त खंड (ग) मध्ये उल्लेखलेल्या प्रवर्गातील व्यक्तींचा कोणताही अधिसंघ नसेल, तेथे, पूर्वोक्त प्रमाणे अधिसूचित करण्यात येतील, अशा नवीन वृत्तसंस्थांकडून पॅनल मागवण्यात येईल.

(५) केंद्र शासन पोटकलम (३) अन्वये सदस्य म्हणून नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची नावे शासकीय राजपत्रामध्ये अधिसूचित करील आणि अधिसूचित करण्यात आल्याच्या तारखेपासून असे प्रत्येक नामनिर्देशन अंमलात येईल.

(६) पोटकलम (५) अन्वये अधिसूचित केलेले परिषदेचे सदस्य, विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार, त्यांच्यामधून, पोटकलम (२) मध्ये उल्लेखलेल्या समितीचा सदस्य म्हणून एका व्यक्तीची निवड करतील आणि अशा निवडीच्या प्रयोजनार्थ घेतलेल्या सदस्यांच्या बैठकीत, त्यांच्यामधून निवडलेली व्यक्ती, अध्यक्षस्थान स्वीकारील.

त्यांचा पदावधी व सेवानिवृत्ती.

६. (१) या कलमात अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, अध्यक्ष व इतर सदस्य तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करतील :

परंतु, कलम ५ च्या उपबंधानुसार परिषदेची पुनर्रचना होईपर्यंत किंवा सहा महिन्यांच्या काला-वधीसाठी, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अध्यक्ष, ते पद धारण करणे चालू ठेवील.

(२) कलम ५ च्या पोटकलम (३) चे खंड (क), खंड (ख) किंवा खंड (ग) अन्वये सदस्य म्हणून नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीवर कलम १५ च्या पोटकलम (१) च्या उपबंधाअन्वये ठपका ठेवण्यात आल्यास ती व्यक्ती परिषदेचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(३) कलम ५ पोटकलम (३) च्या खंड (ङ) अन्वये नामनिर्देशित केलेल्या सदस्याचा पदावधी त्याला ज्या सभागृहातून नामनिर्देशित करण्यात आले असेल, त्या सभागृहातील त्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्यावर तावडतोब समाप्त होईल.

(४) एखादा सदस्य जर परिषदेच्या लागोपाठच्या तीन बैठकींना परिषदेच्या मते पुरेसा कारणा-शिवाय गैरहजर असेल, तर सदस्याने त्याचे पद रिक्त केल्याचे मानण्यात येईल.

(५) अध्यक्ष, केंद्र शासनाला लेखी नोटीस देऊन त्याच्या पदाचा राजीनामा देईल आणि कोणताही अन्य सदस्य, अध्यक्षाला लेखी नोटीस देऊन त्याच्या पदाचा राजीनामा देईल आणि असा राजीनामा केंद्र शासनाकडून, किंवा प्रकरणपरत्वे, अध्यक्षाकडून स्वीकारण्यात आल्यानंतर अध्यक्षाने किंवा सदस्याने त्याचे पद रिक्त केल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९९४ चा अधिनियम ३६, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

(६) पोटकलम (२), पोटकलम (३), पोटकलम (४) किंवा पोटकलम (५) अन्वये रिक्त होणारे किंवा अन्यथा रिक्त होणारे कोणतेही पद, ते पद रिक्त करणारा सदस्य ज्या पद्धतीने नामनिर्देशित केलेला असेल तशाच पद्धतीने लवकरात लवकर नामनिर्देशनाद्वारे, भरण्यात येईल. व ज्याच्या पदावर तो सदस्य नामनिर्देशित करण्यात आलेला असेल तो सदस्य जेवढ्या कालाकरिता पदावर राहिला असता त्या उर्वरित कालावधीसाठी असा नामनिर्देशित सदस्य ते पद धारण करील.

(७) सेवानिवृत्त सदस्य फक्त एकाच पदावधीकरिता पुनर्नामनिर्देशनासाठी पात्र असेल.

**सदस्यांच्या सेवा शर्ती.**

७. (१) अध्यक्ष हा पूर्णकालिक अधिकारी असेल आणि केंद्र शासनाला योग्य वाटेल इतके वेतन त्याला देण्यात येईल; आणि इतर सदस्यांना परिषदेच्या बैठकींना हजर राहण्यासाठी, विहित करण्यात येतील असे भत्ते किंवा फी मिळेल.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांना अधीन राहून सदस्यांच्या सेवा शर्ती विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

(३) याद्वारे असे घोषित करण्यात येते की, परिषदेच्या सदस्याचे पद धारण करणारी व्यक्ती, संसदेच्या कोणत्याही सभागृहाची सदस्य म्हणून निवडून आल्यामुळे किंवा सदस्य असल्यामुळे अनर्ह ठरणार नाही.

**परिषदेच्या समित्या.**

८. (१) या अधिनियमाखालील कामे पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी परिषद तिच्या सदस्यांमधून सर्व साधारण किंवा विशेष प्रयोजनांसाठी तिला आवश्यक वाटतील अशा समित्या घटित करील आणि अशा प्रकारे घटित केलेली प्रत्येक समिती, परिषदेने तिला नेमून दिलेली कामे पार पाडील.

(२) पोटकलम (१) अन्वये घटित करण्यात आलेल्या कोणत्याही समितीचे सदस्य म्हणून परिषदेला, तिला योग्य वाटतील इतक्या परिषदेच्या सदस्य नसणाऱ्या अन्य व्यक्तींना, स्वीकृत करून घेण्याच्या शक्ती असतील.

(३) अशा कोणत्याही सदस्याला, तो अशा प्रकारे ज्या समितीवर स्वीकृत करून घेण्यात आला असेल त्या समितीच्या कोणत्याही बैठकीमध्ये उपस्थित राहण्याचा व चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल ; मात्र, मत देण्याचा हक्क नसेल व कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी तो सदस्य असणार नाही.

**परिषद व समित्यांच्या बैठकी.**

९. परिषद किंवा तिची कोणतीही समिती, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या विनियमाद्वारे उपबंधित केले असेल त्यावेळी व त्याठिकाणी बैठक आयोजित करील आणि बैठकींमध्ये कामकाज पार पाडण्यासंबंधीच्या कार्यपद्धतीच्या उपबंधित नियमांचे पालन करील.

**सदस्यांची रिक्त पदे किंवा घटनेतील उणीवा यांच्यामुळे परिषदेची कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.**

१०. परिषदेची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही केवळ त्या परिषदेमध्ये असणाऱ्या कोणत्याही रिक्त पदामुळे किंवा त्या परिषदेच्या घटनेतील कोणत्याही उणीवांमुळे, विधिअग्राह्य मानली जाणार नाही.

**परिषदेचा कर्मचारी वर्ग.**

११. (१) केंद्र शासन या बाबतीत करील अशा नियमांच्या अधीनतेने या अधिनियमान्वये परिषदेची कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता, परिषद सचिवाची, व तिला आवश्यक वाटेल अशा इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करील.

(२) या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, विनियमाद्वारे निर्धारित करण्यात येतील तशा असतील.

**परिषदेच्या आदेशांचे व अन्य संलेखांचे अधिप्रमाणन.**

१२. परिषदेचे सर्व आदेश व निर्णय हे अध्यक्षांच्या किंवा याबाबत परिषदेने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही सदस्याच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येतील व परिषदेने दिलेले अन्य संलेख, सचिवाच्या किंवा परिषदेने याबाबतीत तशाच रीतीने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येतील.

## प्रकरण तीन

## परिषदेच्या शक्ती व कार्ये

**परिषदेची उद्दिष्टे व कार्ये.**

१३. (१) भारतातील वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे व वृत्तपत्रांचा व वृत्तसंस्थेचा दर्जा राखणे व सुधारणे ही, परिषदेची उद्दिष्टे असतील.

(२) परिषद तिच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी पुढील कार्ये पार पाडील, ती अशी :—

(क) वृत्तपत्र व वृत्तसंस्था यांना त्यांचे स्वातंत्र्य राखण्यास मदत करणे ;

(ख) उच्च व्यावसायिक दर्जानुसार वृत्तपत्र, वृत्तसंस्था किंवा पत्रकार यांच्याकरिता आचार संहिता तयार करणे ;

(ग) वृत्तपत्रे, वृत्तसंस्था व पत्रकार यांच्याकडून लोकांच्या अभिरुचीचा उच्च दर्जा राखला जातो आहे, याची खात्री करून घेणे व नागरिकत्वाचे अधिकार व जबाबदारी या दोहोंबद्दलची जनतेमधील सम्यक भावना वाढीला लावणे ;

(घ) पत्रकारितेच्या व्यवसायात असलेल्या सर्व लोकांमध्ये जबाबदारीची व जनसेवेची भावना वाढण्यास उत्तेजन देणे ;

(ङ) सार्वजनिक हिताच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बातम्या पुरवणे व त्या प्रसृत करणे, यात अडथळा आणण्याचा संभव असणाऱ्या काही घटना घडत नाही ना, याकडे लक्ष ठेवणे ;

(च) कोणत्याही विदेशी स्त्रोतामार्फत भारतातील कोणतेही वृत्तपत्र किंवा वृत्तसंस्था यांना मिळालेल्या सहाय्याची प्रकरणे, तसेच केंद्र शासनाने त्यांच्याकडे विचारार्थ पाठविलेली किंवा कोणत्याही व्यक्तीने, सदस्यांच्या अधिसंघाने किंवा कोणत्याही अन्य संघटनेने त्यांच्या निदर्शनास आणून दिलेली प्रकरणे यांवर पुर्नविचार करणे :

परंतु, या खंडातील कोणत्याही गोष्टीमुळे केंद्र शासनाला विदेशी स्त्रोतामार्फत भारतातील वृत्तपत्रे किंवा वृत्तसंस्था यांना मिळालेल्या सहाय्याचे कोणतेही प्रकरण, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही अन्य पद्धतीने हाताळण्यास प्रतिबंध होणार नाही.

(छ) विदेशी वृत्तपत्रांच्या तसेच विदेशी राज्यांच्या भारतातील कोणत्याही राजदूतावासाकडून किंवा अन्य प्रतिनिधीकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या विदेशी वृत्तपत्रांचाही खप व प्रभाव याचा अभ्यास करणे ;

**स्पष्टीकरण.**— या खंडाच्या प्रयोजनार्थ, "विदेशी राज्य" याचा अर्थ, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या कलम ८७क मध्ये त्याला नेमून दिल्याप्रमाणे आहे ;

(ज) वृत्तपत्रांच्या उत्पादनामध्ये किंवा प्रकाशनामध्ये किंवा वृत्तसंस्थांमध्ये गुंतलेल्या सर्व वर्गाच्या लोकांमध्ये योग्य असे कार्यात्मक संबंध वाढीस लावणे :

परंतु असे की, या खंडातील कोणत्याही गोष्टीद्वारे, ज्याला औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ लागू होतो अशा विवादासंबंधीची कोणतीही कामे परिषदेकडे प्रदान केली आहेत, असे मानण्यात येणार नाही ;

(झ) वृत्तपत्रे व वृत्तसंस्था यांच्या मालकीचे केंद्रीकरण किंवा त्याचे इतर घटक यासारख्या वृत्तपत्र स्वातंत्र्याला बाधा आणणाऱ्या घडामोडींच्या बाबतीत चिंता व्यक्त करणे ;

(ञ) परिषदेकडे सोपविण्यात येईल असे अभ्यास कार्य हाती घेणे आणि केंद्र शासनाने तिच्याकडे निर्देशित केलेल्या कोणत्याही प्रकरणाबाबत तिचे मत व्यक्त करणे ;

(ट) वरील कामे पार पाडण्यासाठी आनुषंगिक किंवा साधक असतील अशा अन्य कृती करणे.

टीका करण्याची शक्ती.

१४. (१) परिषदेकडे तक्रार करण्यात आल्यानंतर किंवा अन्यथा जेव्हा असे मानण्यास संयुक्तिक कारण असेल की, वृत्तपत्राने किंवा वृत्तसंस्थेने पत्रकारितेच्या नीतितत्त्वाच्या किंवा लोकांच्या अभिरुचीच्या दर्जाचे उल्लंघन केले आहे किंवा त्या संपादकाने किंवा श्रमिक पत्रकाराने कोणतीही व्यावसायिक गैरवर्तणूक केली आहे तेव्हा परिषद, या वृत्तपत्राला, वृत्तसंस्थेला, संपादकाला किंवा पत्रकाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्या अधिनियमान्वये केलेल्या विनियमांमध्ये उपबंधित केलेल्या रीतीने चौकशी आयोजित करील आणि तसे करणे आवश्यक आहे अशी तिची खात्री पटल्यावर, त्याची कारणे लेखी नमूद करून त्या वृत्तपत्राला, वृत्तसंस्थेला, संपादकाला किंवा पत्रकाराला ताकीद देईल, समज देईल किंवा त्याची निंदा करेल अथवा त्या संपादकाच्या किंवा पत्रकाराच्या वर्तनास नापसंती दर्शवील :

परंतु असे की, चौकशी करण्यासाठी पुरेसा आधार नाही असे जर अध्यक्षाचे मत झाले तर, परिषद तक्रारीची दखल घेणार नाही.

(२) लोकहितार्थ असे करणे आवश्यक आणि इष्ट आहे असे जर परिषदेचे मत झाले तर, परिषद एखादे वृत्तपत्र, वृत्तसंस्था, संपादक किंवा श्रमिक पत्रकार यांच्याविरुद्ध या कलमाअन्वये केलेल्या कोणत्याही चौकशी संबंधीचा असे वृत्तपत्र, वृत्तसंस्था, संपादक किंवा श्रमिक पत्रकार यांच्या नावासह कोणताही तपशील परिषदेला, योग्य वाटेल अशा रीतीने कोणत्याही वृत्तपत्रातून प्रकाशित करण्यास त्या वृत्तपत्रास फर्मावील.

(३) पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायालयामध्ये ज्या संबंधात कार्यवाही प्रलंबित आहे अशा कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्याच्या शक्ती परिषदेकडे प्रदान करण्यात आल्या आहेत असे मानण्यात येणार नाही.

(४) पोटकलम (१) किंवा प्रकरणपरत्वे, पोटकलम (२) खालील परिषदेचा निर्णय हा अंतिम असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेतला जाणार नाही.

**परिषदेच्या सर्वसाधारण शक्ती.** १५. (१) परिषदेची कामे पार पाडण्याच्या किंवा या अधिनियमान्वये कोणतीही चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ परिषदेला, खालील प्रकरणाबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दाव्याची संपरीक्षा करीत असताना दिवाणी न्यायालयाला ज्या शक्ती विहित करण्यात आलेल्या असतील त्याच शक्ती संपूर्ण भारतभर असतील :—

(क) व्यक्तींना हजर राहण्यास फर्मावणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर त्यांची तपासणी करणे,

(ख) दस्तऐवजांचे प्रकटीकरण करण्यास व त्यांचे निरीक्षण करण्यास भाग पाडणे,

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे,

(घ) एखाद्या न्यायालयामधून किंवा कार्यालयामधून एखाद्या सरकारी अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतींची मागणी करणे,

(ङ) साक्षीदार किंवा दस्तऐवज यांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे देणे आणि

(च) विहित करण्यात येईल अशी एखादी अन्य बाब.

(२) पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, एखाद्या वृत्तपत्राला, एखाद्या वृत्तसंस्थेला, संपादकाला किंवा पत्रकाराला, त्या वृत्तपत्राद्वारे प्रसिद्ध केलेल्या किंवा त्या वृत्तसंस्थेला, संपादकाला किंवा पत्रकाराला मिळालेल्या किंवा त्याने दिलेल्या कोणत्याही वृत्ताचा किंवा माहितीचा स्त्रोत उघडकीस आणण्याची सक्ती होते, असे मानण्यात येणार नाही.

(३) परिषदेकडून केलेली प्रत्येक चौकशी ही, भारतीय दंड संहितेच्या कलम १९३ व २२८ च्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल.

(४) परिषदेला, तिची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी किंवा या अधिनियमानुसार तिची कोणतीही कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटल्यास ती, शासनासह कोणत्याही प्राधिकरणाच्या वर्तणुकीसंबंधातील, तिला योग्य वाटतील असे अभिप्राय, तिच्या निर्णयपत्रात किंवा अहवालात नमूद करील.

**फीची आकारणी.** १६. (१) परिषद, या अधिनियमाअन्वये तिची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ विहित करण्यात येईल अशा फीची, तेवढ्या दराने व तशा रीतीने नोंदणीकृत वृत्तपत्रे व वृत्तसंस्थाकडून आकारणी करील व विविध वृत्तपत्रांचा खप व इतर गोष्टी लक्षात घेऊन त्या वृत्तपत्रांसाठी निरनिराळे दर विहित करण्यात येतील.

(२) पोटकलम (१) अन्वये परिषदेला देय असणारी कोणतीही फी, जमीन महसूलाच्या थकबाकी-प्रमाणे वसूल करता येईल.

**परिषदेला रक्कम प्रदान करणे.** १७. केंद्र शासन, संसदेने याबाबतीतील कायद्याद्वारे योग्य विनियोजन केल्यानंतर, परिषदेला, या अधिनियमाअन्वये तिची कामे पार पाडण्यासाठी केंद्र शासनास आवश्यक वाटेल अशी रक्कम, अनुदाना-च्या स्वरूपात प्रदान करील.

**परिषदेचा निधी.** १८. (१) परिषदेकडे तिचा स्वत:चा निधी असेल, आणि तिने वसूल केलेली फी, केंद्र शासनाकडून तिला वेळोवेळी देण्यात येतील अशा सर्व रकमा आणि दुसऱ्या एखाद्या प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने तिला दिलेली सर्व अनुदाने व अग्रिमे या निधीमध्ये जमा करण्यात येतील आणि परिषदेकडून देण्यात येणाऱ्या सर्व रकमा त्यातून देण्यात येतील.

(२) निधीची सर्व रक्कम, केंद्र शासनाच्या मान्यतेस अधीन राहून परिषद ठरवील अशा बँकेमध्ये ठेवता येईल किंवा तशाप्रकारे गुंतवता येईल.

(३) परिषद, या अधिनियमाखालील तिची कार्ये पार पाडण्यासाठी तिला योग्य वाटेल अशी रक्कम खर्च करू शकेल आणि ही रक्कम, निधीतून देय असलेला खर्च म्हणून समजण्यात येईल.

**अर्थसंकल्प.** १९. परिषद, प्रतिवर्षी विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये व अशा वेळी आगामी वित्तीय वर्षासंबंधीची अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा अर्थसंकल्प तयार करील व त्याच्या प्रती केंद्र शासनाकडे पाठवील.

**वार्षिक अहवाल.** २०. परिषद, वर्षातून एकदा विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये व अशावेळी मागील वर्षामधील कार्यक्रमांचा गोषवारा देणारा आणि वृत्तपत्रे व वृत्तसंस्थांच्या मानकांचा व त्यांच्यावर परि-णाम करणाऱ्या घटकांचा तपशील देणारा वार्षिक अहवाल तयार करील व त्याच्या प्रती, कलम २२ अन्वये विहित केलेल्या रीतीने लेखापरीक्षा केलेल्या लेख्यांच्या विवरणपत्रासह केंद्र शासनाकडे पाठवील आणि शासन तो संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्याची व्यवस्था करील.

अंतरिम अहवाल. २१. कलम २० च्या उपबंधांना बाधा न पोचवता, परिषद त्या वर्षातील सार्वजनिक दृष्ट्या तिला महत्त्वपूर्ण वाटणाऱ्या तिच्या कार्याचा गोषवारा देणारा अहवाल वर्षभरात केव्हाही तयार करू शकेल आणि त्याच्या प्रती केंद्र शासनाकडे पाठवील आणि शासन तो संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्याची व्यवस्था करील.

लेखा व लेखापरीक्षा. २२. परिषदेचा लेखा, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून विहित करण्यांत येईल अशा पद्धतीनुसार ठेवण्यात येईल आणि त्याची लेखापरीक्षा करण्यात येईल.

## प्रकरण चार

### संकीर्ण

सद्भावपूर्वक केलेल्या कार्याचे संरक्षण करणे. २३. (१) परिषद किंवा तिचा एखादा सदस्य किंवा परिषदेच्या निदेशानुसार काम करणारी एखादी व्यक्ती यांच्याविरुद्ध या अधिनियमाअन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करणे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत, कोणताही दावा लावण्यात येणार नाही. किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही केली जाणार नाही.

(२) परिषदेच्या प्राधिकारपत्राअन्वये एखाद्या वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या कोणत्याही मजकुराच्या बाबतीत त्या वृत्तपत्राविरुद्ध दावा लावण्यात किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार नाही.

सदस्य, इत्यादी हे लोकसेवक असणे. २४. परिषदेचा प्रत्येक सदस्य आणि परिषदेने नियुक्त केलेला प्रत्येक अधिकारी किंवा अन्य कर्मचारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

नियम करण्याची शक्ती. २५. (१) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल :

परंतु असे की, ज्यावेळी परिषदेची स्थापना केलेली असेल तेव्हा, परिषदेशी विचारविनिमय केल्याशिवाय असे नियम तयार केले जाणार नाहीत.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेला बाध न पोचवता अशा प्रकारच्या नियमांत खालील सर्व किंवा काही प्रयोजनांसाठी उपबंध करता येतील :—

(क) कलम ५ च्या पोटकलम (३) चे खंड (क), (ख) व (ग) अन्वये परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची कार्यपद्धती ;

(ख) कलम ५ च्या पोटकलम (४) अन्वये नावांचे पॅनल आमंत्रित करण्याची रीत;

(ग) कलम ५ च्या पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या समितीच्या सदस्यांची त्या कलमाच्या पोटकलम (६) अन्वये निवड करण्याची कार्यपद्धती;

(घ) परिषदेच्या सभांना हजर राहण्यासाठी परिषदेच्या सदस्यांना द्यावयाचा भत्ता किंवा फी आणि कलम ७ च्या पोटकलम (१) व (२) अन्वये अशा सदस्यांच्या सेवेच्या अन्य शर्ती ;

(ङ) कलम ११ अन्वये परिषदेचा सचिव व अन्य कर्मचारी यांची नियुक्ती ;

(च) कलम १५ च्या पोटकलम (१) च्या खंड (च) मध्ये उल्लेखिलेल्या बाबी;

(छ) कलम १६ अन्वये परिषदेकडून फी आकारण्यात येईल तो दर आणि ज्या रीतीने ती आकारण्यात येईल ती रीत ;

(ज) परिषदेने अनुक्रमे कलम १९ व २० अन्वये ज्या नमुन्यामध्ये व ज्या कालावधीमध्ये अर्थसंकल्प व वार्षिक अहवाल तयार करावयाचा तो नमुना व तो कालावधी;

(झ) कलम २२ अन्वये ज्या रीतीने परिषदेने लेखे ठेवावयाचे आणि त्याची लेखापरीक्षा करावयाची ती रीत.

(३) या कलमाखालील केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून, बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा, तो नियम करण्यात येऊ नये, याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही ;

२६. [1][ (१) [परिषद, [1][शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे] या अधिनियमाशी आणि त्याखाली केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम पुढील गोष्टींसाठी तयार करील— **विनियम तयार करण्याची शक्ती.**

(क्) परिषदेच्या किंवा तिच्या एखाद्या समितीच्या सभांचे आणि कलम ९ अन्वये तेथील कामकाज चालविण्याच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणे ;

(ख्) कलम ११ च्या पोटकलम (२) अन्वये परिषदेने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विनिर्दिष्ट करणे ;

(ग्) या अधिनियमान्वये कोणतीही चौकशी आयोजित करण्याच्या पद्धतीचे विनियमन करणे ;

(घ्) परिषदेच्या अध्यक्षाला किंवा सचिवाला कलम १८ च्या पोटकलम (३) खालील काही शक्ती परिषदेस लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीनतेने प्रत्यायोजित करणे;

(ङ्) या अधिनियमाखालील विनियमाद्वारे ज्यांच्यासाठी उपबंध करता येईल अशा काही अन्य बाबी :

परंतु असे की, खंड (ख्) अन्वये केलेले विनियम केवळ केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने करण्यात येतील.

[1][ (२) केंद्र शासन, या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळन बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवण्यास भाग पाडील आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत अथवा तो विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो विनियम अशा आपरिवर्तन रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

[3]* * * * * *

---

१. १९८३ चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ व अनुसूचीद्वारे कलम २६ ला पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि विवक्षित मजकूर दाखल करण्यात आला. (१५ मार्च, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम क्रमांक २०, याचे कलम २ व अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला. (१५ मार्च, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. १९८८ चा अधिनियम क्रमांक १० याचे कलम २ व अनुसूचीद्वारा निरसित.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई